# उमेद

अंधार एकला गाई, रात्रीची व्यथा विराणी
क्षितिजाची हाकही विरली, त्या उनाड वाऱ्यावरती

जड पाऊले घुटमळली, अन दिशा केविलवाणी
संयमही मग ढळला, बिलगुनिया पाचोळ्याशी

अधराची थरथर वाढे, भिरभिरते नजर भवताली
वाटेची खूण हरवली, अन उमेद मावळलेली

किर्र शब्द रातीला, एकच साथ माझी
प्रकाश शोधण्या जाता, काजवाही मिटून जाई

नकळत सांडून येती, घट तारकांचे गगनी
सोसले दीर्घ सारे, क्षणात वीरघळूनी जाई

या युगात कितीदा, थकलो हरवलो मी
पाऊल पुढे परंतु, एक पूर्वेच्या दिशेनी

**सचिन कुलकर्णी**

**www.saarthbodh.com**